बुधवार, दि २७ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक १ ला ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## जिल्ह्यात यलो अलर्ट;

# सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि. २७ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट २०२५ रोजी यलो (Yellow) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) येण्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. ३० ऑगस्ट २०२५ रोजी हलक्या स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे.वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतक-यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहजन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# ‘स्वच्छता ॲप’


## नागरिकांसाठी स्वच्छतेची तक्रार नोंदवण्यासाठी आधुनिक सुविधा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेने नागरिकांना स्वच्छतेसंदर्भात तक्रारी नोंदवण्यासाठी एक अभिनव 'स्वच्छता ॲप' सुरू केले आहे. या पद्वारे नागरिक विविध प्रकारच्या समस्यांची तक्रार नोंदवू शकतात आणि त्या तक्रारींचे निवारण तातडीने होईल अशी अपेक्षा आहे. जालनेकरांनी या ॲपवर तक्रारी करण्यास सुरुवात केलेली आहे.

या ॲपमध्ये पुढील समस्यांबाबत तक्रारी नोंदवण्याची सुविधा उपलब्ध आहे यात सेप्टिक टाक्यांचा ओव्हरफ्लो, गटारे स्वच्छ करणे, मृत प्राणी, कचरापेटी स्वच्छ नाही, कचऱ्याचे ढिगारे, कचरागाडी आली नाही, केर काढलेला नाही, सार्वजनिक स्वच्छतागृहांतील समस्या (वीज, पाणी, ब्लॉकेज), उघड्या मॅनहोलविषयी तक्रार, रस्त्यावर साचलेले पाणी, उघड्यावर कचरा जाळणे किंवा मलविसर्जन करणे, बांधकाम व राडारोडा,

नागरिकांनी या ॲपवर तक्रार करताना समस्येचा फोटो अपलोड करण्याची सोय आहे. तसेच, तक्रारीचे जिओ-लोकेशन (Geo Location) सादर केल्यास स्वच्छता निरीक्षकांना त्या ठिकाणी त्वरित पोहोचून समस्या सोडवणे सोपे जाईल.

जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्री. संतोष खांडेकर यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी गुगल प्लेस्टोअरवरून 'Swachhata App' ( https://play.google.com/store/apps/details?id=com.ichangemycity.swachhbharat ) डाउनलोड करावे किंवा सोबत दिलेल्या QR कोड स्कॅन करून ॲप पान ३ वर




# जालना गणेश फेस्टीव्हल; सभा मंडपाचे काम अंतीम टप्प्यात



**जालना । प्रतिनिधी -** जालना गणेश फेस्टीव्हल हे रौप्यमहोत्सवी वर्षे आहे. त्यानिमित्त जालनेकरांसाठी दर्जेदार कार्यक्रमांची मेजवाणी देणार असून सर्वांमध्येच उत्स्फूर्तपणा दिसून येत आहे. हा फेस्टीव्हल उत्स्फुर्तच व्हावा, असेच प्रयत्न सुरु असून यंदाही जालनेकरांसाठी दर्जेदार कार्यक्रम घेण्याचा मनोदय फेस्टीव्हलचे अध्यक्ष अशोकराव आगलावे यांनी बोलून दाखवला. दरम्यान, सभा मंडपाचे काम ही अंतीम टप्प्यात आले असल्याचेही ते म्हणाले. हा फेस्टीव्हल पान ३ वर

# न्यायालयीन वाद मध्यस्ती प्रक्रियेने सहज मिटतात - ॲड महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** न्यायालयात अनेक प्रकरण प्रलंबीत असुन ज्यामध्ये बहुतांश वाद हे कौटुंबीक किंवा रक्कम वसुली संदर्भात आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयाकडुन मध्यस्ती करुन प्रकरण मिटविण्यासाठी भर दिले जात आहे. रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊन तर्फे वाद प्रकरण व्यवस्थापन या विषयावर सॅफ्रॉन हॉटेल, जालना येथे आयोजित कार्यशाळेत रो. ॲड. महेश धन्नावत, कार्याध्यक्ष नोटरी असोसिएशन, जालना यांनी सांगितले की, सार्वजनिक जिवनातील गैरसमज किंवा कौटुंबीक वादातुन न्यायालयात प्रकरण दाखल होतात व प्रकरण न्यायालयात प्रलंबीत राहतात. न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत असतांना पक्षकार एकमेकांशी बोलत नाही व त्यांचे जुने नाते सुध्दा संपुष्टात येण्याच्या वाटेवर राहतात. न्यायालयात निर्णय लागण्यासाठी वेळ व पैशांचा अपवय सुध्दा होतो. मात्र जर न्यायालयातील तज्ञ मध्यस्तींच्या माध्यमातुन प्रकरण संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न केले गेले तर तज्ञ मध्यस्त हे वादातील दोन्ही पक्षकारांना समन्वयाने त्याच्या ज्ञानाचा वापर करुन आपसी वाद कसा संपुष्टात स्वतः आणता येईल यासाठी प्रयत्न करीत असतात. मध्यस्तींच्या वतीने प्रकरण संपुष्टात आले, तर न्यायालयात भरलेली कोर्ट फी सुध्दा परत मिळण्यास मदत होते व न्यायालयीन खर्च सुध्दा वाचतो व भविष्यात आपला वेळ व पैसा सुध्दा वाचतो. या कार्यशाळेत बँकेतील अनेक अधिकारी, व्यापारी व शासकीय कार्यालयातील लोक उपस्थित होतात. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्लबचे अध्यक्ष अंकीत अग्रवाल,ॲड. अंकिता बाफना,सचिव राजनंदीनी राठोर, प्रतिक नानावटी, डॉ. सुजाता नानावटी व विधिज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोवळं ऊन पुस्तकाचे प्रकाशन

**मुंबई -** सिंगापूरस्थित, चतुरस्त्र आंतरराष्ट्रीय लेखिका श्रीमती नीला बर्वे यांच्या ‘कोवळं ऊन’ या पहिल्या कथासंग्रहाचे दिमाखदार प्रकाशन नुकतेच ज्ञानवृद्ध श्री. एन. एन. श्रीखंडे यांच्या हस्ते संपन्न झाले. समारंभाचे अध्यक्षस्थान व्यासंगी साहित्यिक श्री. राजीव एन. श्रीखंडे यांनी भूषविले.

या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार डॉ. सुकृत खांडेकर, लोकमान्य सेवा संघाचे अध्यक्ष मुकुंद चितळे, कुटुंब रंगलंय काव्यात फेम प्रा. विसुभाऊ बापट, कवयित्री सोनाली जगताप, न्यूज स्टोरी टुडेच्या प्रकाशिका सौ. अलका भुजबळ आणि संपादक देवेंद्र भुजबळ आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सौ. अलका भुजबळ यांनी प्रास्ताविक करताना नीला बर्वे यांच्याशी झालेल्या ओळखीपासून त्यांच्या पोर्टलसाठी लिहिण्याचा प्रवास सांगितला.




त्या म्हणाल्या, कोवळं ऊनमधील सर्वच कथा मनाला भिडल्या आणि म्हणूनच हे पुस्तक प्रकाशित करताना आनंद वाटतो.

मनोगतात, लेखिका नीला बर्वे यांनी त्यांच्या लेखन प्रवासातील प्रेरणांचा उहापोह केला. त्यांनी वाचकांच्या सोयीसाठी प्रत्येक कथेसोबत ठ कोड दिल्याचे नमूद केले, ज्यामुळे दृष्टिहीन वाचकही ऑडिओद्वारे या कथा अनुभवू शकतात.

मान्यवरांनी आपल्या भाषणातून लेखिकेच्या लेखन वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला. श्री. एन. एन. श्रीखंडे यांनी प्रत्येक कथेचे रसग्रहण केले. डॉ. सुकृत खांडेकर यांनी, या १६ कथांवर १६ चित्रपट तयार होऊ शकतात, असे मत व्यक्त केले. मुकुंद चितळे यांनी, संस्था समाजपरिवर्तनाचे केंद्र असते, असे सांगून पुस्तकाला शुभेच्छा दिल्या. कवयित्री सोनाली जगताप यांनी लेखिकेच्या गोड, शुद्ध आणि ओघवत्या लेखनशैलीचे कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात राजीव श्रीखंडे यांनी नीला बर्वे यांच्या पान ३ वर

# संपादकीय

## विघ्नांचा नाश आणि सकारात्मकतेचा संदेश

आजपासून सुरू होणारा गणेशोत्सव महाराष्ट्राला भक्ती, उत्साह आणि ऐक्याचा नवा अनुभव देणार आहे. परंतु या सणाच्या उंबरठ्यावर राज्य अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे. अतिवृष्टी, निवडणुकीपूर्वी दिलेली अपुरी राहिलेली आश्वासने, रखडलेली विकासकामे, अनुदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था, अडचणीत सापडलेले शेतकरी, वाढती गुन्हेगारी आणि महिलांची असुरक्षितता - ही वास्तवाची जाणीव आपण विसरू नये. महाराष्ट्राच्या तिजोरीवरील ताण लक्षात घेतला तर या समस्यांचे गांभीर्य अधिक प्रकर्षाने समोर येते. अशा वेळी गणपती बाप्पाकडून प्रार्थना करावीशी वाटते - की त्यांनी आपल्या नेत्यांना, सत्ताधाऱ्यांना आणि प्रशासनाला या विघ्नांचा नाश करून सुज्ञ, दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेण्याची प्रेरणा द्यावी. राज्याच्या प्रगतीचा मार्ग संवाद, नियोजन आणि पारदर्शक प्रशासनातूनच सुकर होणार आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नाही, तर तो सामाजिक जागृतीचा मंच आहे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवामागे समाजात एकता निर्माण करणे आणि सामाजिक विषयांवर चर्चा घडवून आणणे हा मुख्य हेतू होता. आजही या सणाचे खरे महत्त्व सकारात्मकतेत आणि बांधिलकीत आहे. मंडळांनी फक्त रोषणाई, देखावे आणि खर्चिक स्पर्धांमध्ये न गुंतता सामाजिक उपक्रमांना प्राधान्य द्यावे. पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्ती, वृक्षारोपण, रक्तदान, आरोग्य शिबिरे, शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम, महिलांच्या सुरक्षेवरील जनजागृती असे उपक्रमच गणेशोत्सवाला खरा अर्थ देतात. डिजे वाद्यांवर असलेली बंदी योग्यच असली तरी काही प्रमाणात सूट मिळण्याची शक्यता व्यक्त होते. मात्र आवाज प्रदूषणाचे दुष्परिणाम लक्षात घेऊन पारंपरिक ढोल, ताशा, लेझीम यांसारख्या वाद्यांना प्रोत्साहन देणे अधिक योग्य ठरेल. पारंपरिक मिरवणुकीतून निघणारा शिस्तबद्ध उत्साह आणि सांस्कृतिक सौंदर्य गणेशोत्सवाची ओळख आहे. या सणात शिस्त, संयम आणि सकारात्मकता जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. एकत्र येऊन समाजहितासाठी कार्य केले, तरच बाप्पाचे आगमन खऱ्या अर्थाने मंगलमय होईल. महाराष्ट्राने या संधीचा उपयोग करून आपली सामाजिक बांधिलकी मजबूत करावी आणि प्रगतीचा मार्ग अधिक सुकर करावा, हाच गणपती बाप्पाच्या पूजेचा खरा संदेश ठरावा.

# बाप्पा तुझ्याकडे इतकेच मागणे !

अतिवृष्टी, निवडणुकीआधी दिलेल्या आश्वासनांमुळे राज्याच्या तिजोरीवर पडलेल्या ताणामुळे रखडलेली विकासकामे, स्थानिक स्वराज्य संस्थांची हालाखीची स्थिती, अनुदानांची प्रतीक्षा, शेतकऱ्यांचे प्रश्न, वाढती गुन्हेगारी, महिलांची असुरक्षितता, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान अशा कित्येक समस्या महाराष्ट्रासमोर आहेत. ही विघ्ने दूर करण्याची बुद्धी बाप्पांनी महाराष्ट्रातील नेत्यांना, सत्ताधाऱ्यांना आणि राजकारण्यांना द्यावी, ही अपेक्षा जरी अतीच आहे, मात्र ही विघ्ने समोर असताना बुद्धिदात्या गणपती बाप्पांनी महाराष्ट्रातील राजकारण्यांनी आपले राजकीय वर्तन सुधारण्याची किंबहुना आपली वक्तव्ये नियंत्रणात ठेवण्याची बुद्धी द्यायला हरकत नाही. मात्र अशा बुद्धीचा स्वीकार राजकारण्यांकडून केला जाईलच याची खात्री नाही, राजकारणाचा संबंध निस्पृह बुद्धी आणि विवेकाशी नसून मुत्सद्दीपणाशी आणि डावपेचाशी असतो. आक्षेपार्ह, असंबंध बोलणे हा आजच्या राजकारणात अवगुण नाही तर ती राजकारणाची गरज बनली आहे. त्यामुळे बुद्धिवंत, समंजस साधीसरळ माणसे राजकारणापासून चार हात लांबच राहाणे पसंत करतात. मात्र त्यांच्या अशा उदासीन आणि राजकीय अनुपस्थितीचा गैरफायदा राजकारण्यांकडून घेतला जातो.

धार्मिक, राजकीय आणि सामाजिक तेढ निर्माण करणारी वक्तव्ये राजकारणी जाणीवपूर्वक करतात, राजकारणी गुन्हेगारांना पाठीशी घालतात, एवढेच नव्हे तर अनेकदा स्वतःच्या लोकप्रतिनिधीपदाच्या अहंकारातून कमकुवत माणसांना कॅमेऱ्यासमोर मारझोड करतात, या अशा वागण्याचे समर्थन करतात. सभागृहांचे अधिवेशन सुरू असताना धार्मिक, भावनिक गैरलागू मुद्दे समोर आणून महत्त्वाच्या प्रश्नांना बगल देणे, राजकारणाकडून जाणीवपूर्वक केला जाणारा हा नेहमीचाच प्रकार आता लोकांच्या अंगवळणी पडला आहे. त्यामुळेच अतिवृष्टीमुळे लोकांची उडालेली दैना, रस्त्यांचे पडलेले खड्डे, रखडलेल्या विकासकामांमुळे निर्माण झालेल्या इतर समस्या याविषयी आता कोणालाही काहीही वाटत नाही. 'हे असेच असते, असेच सुरू राहाणार' अशी निराशेची समजूत प्रत्येकाने करून घेतली आहे. निगरगट्ट राजकारण्यांच्या हे पथ्यावर पडत आले आहे. राजकीय वर्तनात पारदर्शकता, जबाबदारी आणि जनतेच्या हिताला प्राधान्य देणे हा आदर्शवाद कित्येक मैल मागे पडला आहे. भ्रष्टाचार, गटबाजीमुळे राज्याचे राजकारण रसातळाला गेले आहे. राजकारणी आता जनतेशी संवाद करत नाहीत तर त्यांना थेट धमकावतात, वेळप्रसंगी मारझोडही करतात. आपल्या चुकांचे लंगडे समर्थनही करतात. चांगल्या कामासाठी प्रसंगी पक्षभेद बाजूला सारून एकत्र येण्याची महाराष्ट्राची राजकीय परंपराही मागे पडली आहे. अविश्वास, भीती, कुरघोडीला राजकारणात ऊत आला आहे.

जरी बहुमताची सत्ता असली तरी मागील पाच वर्षात राज्यातील राजकीय अस्थिरता दिसून आलेली आहे, यामागे सत्तेच्या वळचणीला जाण्याची हतबलता महाराष्ट्रातल्या राजकारण्यांची अपरिहार्यता ठरली आहे. जातीय, धार्मिक समूहांच्या विघटीत राजकारणांमुळे महाराष्ट्राच्या ऐक्याचे तीन तेरा झाले आहेत. दुसरीकडे भ्रष्टाचाराचे आरोप, विशेषतः पायाभूत सुविधा प्रकल्प, जमीन व्यवहार आणि सरकारी निविदांमध्ये गैरप्रकार झाल्याचे आरोप आहेतच. माहितीच्या अधिकाराची गळचेपी, माध्यमांवरील दबाव, पारदर्शकतेचा अभाव, स्वायत्त यंत्रणांनी सत्तेचे पत्करलेले मांडलिकत्व यामुळे लोकशाहीवर प्रेम असलेला सामान्य माणूस पुरता निराश झाला आहे. सामाजिक मुद्द्यांवरही राज्यातील स्थिती खूप काही चांगली नाही. महाराष्ट्राच्या विधानसभेत महिला आमदारांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. ज्या महिला प्रतिनिधी आहेत त्यांनाही पक्षादेशापलीकडे स्वतःचे लोकप्रतिनिधी म्हणून स्वतंत्र अस्तित्व नाही. आरक्षणासाठी लढणारे सामाजिक गट, आदिवासी, वंचित, पीडितांचे आर्थिक मागासलेपण, सामाजिक भेदभाव, विषमतेचे प्रश्न कित्येक वर्षांपासून कायम आहेत. हे प्रश्न राजकीय हत्यार म्हणूनच वापरले गेल्याचा महाराष्ट्राचा इतिहास आहे. त्याला सध्याचे बहुमतातील सरकारही अपवाद नाही. राज्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर न मिळालेला न्याय, या निराशेत भर घालणारा आहे. शेतकरी आत्महत्या, पाणीटंचाई, पायाभूत सुविधांचा प्रश्न कायम आहे. कापसाच्या किमती, हमीभाव, शेतकऱ्यांवरील वाढते कर्ज, शिक्षण, रोजगाराच्या अपुऱ्या संधी, साधने, कौशल्यांना पुरेशी संधी न मिळाल्यामुळे तरुण निराश आहेत. जातीय, धार्मिक, सांस्कृतिक ध्रुवीकरणासाठीचे तणावपूर्ण राजकारण, निवडणूक प्रक्रियेवर होणाऱ्या आरोपामुळे मतांची घसरणारी टक्केवारी आदी अनेक प्रश्न राज्यासमोर आहेत. सामाजिक संघटनांवर सत्तेच्या दबावामुळे लोकशाहीची ताकद असलेल्या सामाजिक चळवळी संपुष्टात येत आहेत. राजकारणाचे गुन्हेगारीकरण की गुन्हेगारीचे राजकारण असा प्रश्न पडावा इतकी स्थिती बिकट झाली आहे. गुन्हेगारांना सत्तेकडून मिळणारे अभय आणि गुन्हेगारीला सत्तेकडून पाठीशी घातले जाण्याच्या प्रकारांमुळे ही स्थिती आणखी गंभीर झाली आहे. सुरक्षा आणि तपास यंत्रणांवरील राजकीय दबावामुळे लोकांच्या विश्वासाला तडा जात आहे. राजकीय नेत्यांकडून कायद्याचे राजकीय खेळणे झाल्यासारखी स्थिती आहे. न्यायाच्या तत्वावरील उडालेला विश्वास लोकशाहीवरील उडालेला विश्वास आहे. सूज आल्यासारखी शहरांची स्थिती असताना ग्रामीण भागातूनही विकासाच्या नावाखाली भूमिपुत्रांचे स्थलांतर होत आहे. अशा परिस्थितीत राज्यात पालिकांच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. निवडणुकांच्या उत्सवाचे रुपांतर राजकीय उन्मादात होऊ नये, एवढेच साकडे श्रीगणेशापुढे घातले जाऊ शकते. उद्या आगमन होणाऱ्या बाप्पांनी सामान्यांचे एवढेच गाऱ्हाणे ऐकावे आणि त्यांना समस्यांतून दिलासा द्यावा.

**शिवाजी विठ्ठल चौगुले, मु. पो. बेलेवाडी, (मासा) ता.कागल कोल्हापूर**

# श्रीगणेश विघ्नहर्ता व बुद्धीमत्तेचे अथांग महासागर

संपूर्ण सृष्टीचे पालनहार देवाधिदेव महादेव भोले शंकर,तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता सागर आहेत. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धर्मातील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा-अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते.नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते.कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते दैवत.देशात कोणत्याही देवी-देवतांची पुजा असो,परंतु आरतीची सुरूवात गणपतीच्या आरती पासून होत असते.याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते.रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम सुध्दा श्रीगणेशांनी केले.श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते.गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात.गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते.देवी पार्वती आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे.कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही. परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले.हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तीच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले.भगवान शंकरजीनी आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वर्दान दिले.म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते.श्रीगणेशजी विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिद्धी आणि दुसरीचे नाव सिद्धी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ-लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर,भालचंद्र,गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते.त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो.भारत अनेक धर्मांनी, जाती-पंथाने विनलेला देश आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला वेगवेगळ्या देवी-देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा-अर्चना केली जाते.प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण आपली मनोकामना पूर्ण करण्याचा सर्वच प्रयत्न करतात.परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव. गणेशमुर्तीची स्थापना करून गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो. या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला रोषणाईची झगमगाट दिसून येते.यापध्दतीने गणेशोत्सवाचा आनंद संपूर्ण लोक मोठ्या उत्साहाने व गुना गोविंदाने साजरा करतात.लोक गणेशोत्सवात इतके तल्लीन होऊन जातात की १० दिवस कसे गेले हे कोणालाच कळत नाही.गणपती बाप्पा पुन्हा लवकर यावा यासाठी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर याघोषणांचा गजर करत गणपती बाप्पाला निरोप दिला जातो.इंग्रजांना शह देण्यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरूवात केली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने जनजागृती करून इंग्रजां विरूद्ध मोठा लढा उभारला व आक्रमक पवित्रा निर्माण केला.त्यामुळे गणेशोत्सव हा सण स्वतंत्र लढ्यासाठी सूध्दा कारगर सिध्द झाला.पुजेमध्ये मुख्यत्वेकरून दुर्वा,बेल-फुल,शम्मीपत्र, शेंदूर यांचा वापर होतो.भारतात श्रीगणेशांची अनेक मोठ-मोठी मंदिरे आहेत.त्याचबरोबर नेपाळमध्ये आपल्याला गणेशाची असंख्य मंदिरे पहायला मिळतात.कारण श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मुख्य दारावर गणपतीची फोटो आपल्याला दिसुन येते.मानवजातीला देवी-देवतांनी पृथ्वीची रक्षा करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला.परंतु मानवजातीने या धरतीमातेचा दुरूपयोग केल्यामुळे पृथ्वीतलावरील निसर्गाचा दिवसेंदिवस ह्यास होत आहे.याला वाचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात १० दिवस वृक्ष लागवडीची मोहीम सरकार मार्फत,प्रशासना मार्फत, शाळा -महाविद्यालय, सामाजिक संस्थांमार्फत व संपूर्ण गणेश मंडळांच्या मार्फत वृक्षारोपण व्हायला पाहिजे.यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल व येणारे महाप्रलय रोखण्यास मोठी मदत होईल, पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व सर्वत्र हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल.यातही आपल्याला गणेशोत्सवाचा आनंद अवश्य दिसून येईल. गणपती बाप्पा मोरया!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणाऱ्या व्रताविषयीचे शास्त्र

श्री गणेशचतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण आहे. श्री गणेश चतुर्थीला, तसेच श्री गणेशोत्सवाच्या दिवसांत गणेशतत्त्व नेहमीच्या तुलनेत पृथ्वीवर १ सहस्र पटीने कार्यरत असते. या काळात केलेल्या श्री गणेशाच्या उपासनेने गणेशतत्त्वाचा अधिक लाभ होतो. सुखकर्ता, विघ्नहर्ता आणि अष्टदिशांचा अधिपती असलेल्या श्री गणेशाची पूजा भावपूर्ण होऊन त्याचा कृपाशीर्वाद मिळावा, असाच सर्व गणेशभक्तांचा प्रयत्न असतो.

श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणारे व्रत : श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणारे व्रत हे सिद्धीविनायक व्रत या नावाने ओळखले जाते. वास्तविक हे व्रत सर्व कुटुंबांत होणे क्रमप्राप्त आहे. सर्व भाऊ एकत्र रहात असतील म्हणजेच त्यांचा द्रव्यकोश (खजिना) आणि पाकनिष्पत्ती (चूल) एकत्र असेल, तर सर्वांत मिळून एक मूर्ती पुजली तरी चालते; पण ज्या वेळी द्रव्यकोश आणि पाकनिष्पत्ती कोणत्याही कारणास्तव विभक्त असतील, तर त्यांनी आपापल्या घरी स्वतंत्र गणेशमूर्ती पुजावी. ज्या कुटुंबात एकच गणपति बसवण्याची दृढ परंपरा आहे, त्या कुटुंबात ज्या भावामध्ये देवाविषयी अधिक भाव आहे, त्याच्याच घरी गणपति बसवावा.

नवीन मूर्तीचे प्रयोजन : पूजेत गणपति असला, तरी गणपतीची नवीन मूर्ती आणावी. श्री गणेश चतुर्थीच्या वेळी गणेशलहरी पृथ्वीवर खूप जास्त प्रमाणात येतात. त्यांचे आवाहन नेहमीच्या पूजेतील मूर्तीत केल्यास तिच्यात खूप जास्त शक्ती येईल. जास्त शक्ती असलेल्या मूर्तीची साग्रसंगीत पूजाअर्चा वर्षभर नीटपणे करणे कठीण जाते; कारण त्यासाठी कर्मकांडातील बंधने पाळावी लागतात. म्हणून गणेशलहरींचे आवाहन करण्यासाठी नवीन मूर्ती वापरतात आणि ती मूर्ती नंतर विसर्जित करतात.

श्री गणेश चतुर्थीला पुजावयाची मूर्ती कशी असावी ? : चिकणमाती किंवा शाडूची माती यांपासून मूर्ती बनवावी, असा शास्त्रविधी आहे. अन्य वस्तूंपासून (उदा. प्लास्टर ऑफ पॅरिस, कागदाचा लगदा) मूर्ती बनवणे, हे धर्मशास्त्रविरोधी, तसेच पर्यावरणाला घातक आहे. मूर्तीची उंची अधिकाधिक एक फूट ते दीड फूट असावी. मूर्ती शास्त्रानुसार बनवलेली, पाटावर बसलेली, डाव्या सोंडेची अन् नैसर्गिक रंगांनी रंगवलेली असावी. परंपरा किंवा आवड यांप्रमाणे गणेशमूर्ती आणण्यापेक्षा धर्मशास्त्रसंमत गणेशमूर्ती पुजावी.

शास्त्रोक्त विधी आणि रूढी यांचा अवधी : भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मातीचा गणपति करतात. तो डाव्या हातावर ठेवून तेथेच त्याची सिद्धीविनायक या नावाने प्राणप्रतिष्ठा आणि पूजा करून लगेच विसर्जन करावे, असा शास्त्रविधी आहे; पण मनुष्य हा उत्सवप्रिय असल्याने एवढ्याने त्याचे समाधान होईना; म्हणून




दीड, पाच, सात किंवा दहा दिवस श्री गणपति ठेवून त्याचा उत्सव करू लागला. बरेच जण (ज्येष्ठा) गौरीबरोबर गणपतीचे विसर्जन करतात. एखाद्याच्या कुलाचारात गणपति पाच दिवस असेल आणि तो त्याला दीड किंवा सात दिवसांचा करावयाचा असला, तर तो तसे करू शकतो. यासाठी अधिकारी व्यक्तीस विचारण्याची जरूरी नाही. रूढीप्रमाणे पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, सहाव्या, सातव्या किंवा दहाव्या दिवशी श्री गणेशविसर्जन करावे.

मूर्तीची आसनावर स्थापना : पूजेपूर्वी ज्या पाटावर मूर्तीची स्थापना करायची असते, त्यावर तांदूळ (धान्य) ठेवून त्यावर मूर्ती ठेवतात. आपापल्या प्रथेप्रमाणे थोडे तांदूळ किंवा तांदुळाचा लहानसा ढीग करतात. मूर्तीत गणपतीचे आवाहन करून तिची पूजा केल्याने मूर्तीत शक्ती निर्माण होते. त्या शक्तीमुळे तांदूळ भारित होतात. सारख्या कंपनसंख्येच्या दोन तंबोऱ्यांच्या दोन तारा असल्या, तर एकीतून नाद काढल्यास तसा नाद दुसऱ्या तारेतूनही येतो. त्याचप्रमाणे मूर्तीखालील तांदुळात शक्तीमुळे स्पंदने निर्माण झाली की, घरातील तांदुळाच्या साठ्यातही शक्तीची स्पंदने निर्माण होतात. अशा तऱ्हेने शक्तीने भारित झालेले तांदूळ वर्षभर प्रसाद म्हणून खाता येतात.

श्री गणेशचतुर्थीसाठी पुजावयाची मूर्ती घरी कशी आणावी ? : श्री गणेशचतुर्थीसाठी पुजावयाची मूर्ती शक्यतो आदल्या दिवशीच आणून ठेवावी. श्री गणेशाची मूर्ती घरी आणण्यासाठी घरातील कर्त्या पुरुषाने इतरांसह जावे. मूर्ती हातात घेणार्याने हिंदू वेशभूषा करावी, म्हणजे अंगरखा (सदरा)-धोतर किंवा अंगरखा-पायजमा परिधान करावा. त्याने डोक्यावर टोपीही घालावी. मूर्ती आणतांना तिच्यावर रेशमी, सुती किंवा खादीचे स्वच्छ वस्त्र घालावे. मूर्ती घरी आणतांना मूर्तीचे मुख आणणार्याकडे आणि पाठ समोरच्या दिशेस असावी. मूर्तीच्या समोरच्या भागातून सगुण तत्त्व, तर पाठच्या भागातून निर्गुण तत्त्व प्रक्षेपित होत असते. मूर्ती हातात धरणारा हा पूजक असतो. तो सगुणातील कार्याचे प्रतीक आहे. मूर्तीचे मुख त्याच्याकडे केल्यामुळे त्याला सगुण तत्त्वाचा लाभ होतो, तर इतरांना निर्गुण तत्त्वाचा लाभ होतो. श्री गणेशाचा जयजयकार आणि भावपूर्ण नामजप करत मूर्ती घरी आणावी. घराच्या उंबरठ्याबाहेर उभे रहावे. घरातील सुवासिनीने मूर्ती आणणार्याच्या पायांवर दूध आणि नंतर पाणी घालावे. घरात प्रवेश करण्यापूर्वी मूर्तीचे मुख समोरील दिशेस करावे. यानंतर मूर्तीचे औक्षण करून ती घरात आणावी.

सजवलेल्या मखरात पाटावर किंवा चौरंगावर थोड्या अक्षता घालून त्यावर मूर्ती ठेवावी. सजावट पूर्ण व्हायची असल्यास मूर्ती अन्य सुरक्षित जागी ठेवून सजावट लवकरात लवकर पूर्ण करावी. मूर्तीला मखरात बसवल्यानंतर मूर्ती हलणार नाही किंवा मूर्तीस काही अपाय होणार नाही, याची काळजी घ्यावी. मूर्तीवर एखादे वस्त्र किंवा रूमाल घालून ती झाकून ठेवावी. उंदराची मूर्ती वेगळी असल्यास तीही सुरक्षित ठेवावी. मूर्तीचे मुख पश्चिम दिशेला असेल अशा पद्धतीने ठेवावी, तसे शक्य नसल्यास पूजकाने पूजा करतांना स्वतःचे तोंड दक्षिण किंवा पश्चिम दिशेला येणार नाही, अशा पद्धतीने बसावे. मूर्तीचे तोंड पूर्व किंवा उत्तर दिशेला असेल, तर पूजकाने मूर्तीच्या डाव्या हाताला काटकोनात बसावे, म्हणजे पूजकाचे मुख उत्तरेला किंवा पूर्वेला होईल. दक्षिण दिशेला मूर्तीचे तोंड असू नये. दक्षिणेकडे तोंड साधारणपणे उग्र देवतांचे असते, उदा. काली, हनुमान, नरसिंह इत्यादी. गणपतीची जी मूर्ती आपण आणतो, ती उग्र नसून प्रसन्न किंवा शांत असते; म्हणूनच शक्यतो तिला दक्षिणमुखी ठेवू नये.

मध्यपूजाविधी : गणपति घरी असेपर्यंत प्रतिदिन सकाळी आणि संध्याकाळी प्राणप्रतिष्ठा सोडून गणपतीची नेहमी पूजा करतो तशी पूजा करावी आणि शेवटी आरत्या आणि मंत्रपुष्प म्हणावे. गणेशमूर्तीच्या प्रतिष्ठापनेनंतर प्रतिदिन करावयाची पंचोपचार पूजा करावी.

उत्तरपूजा : गणपतीच्या विसर्जनापूर्वी ही पूजा करायची असते. विशिष्ट मंत्र म्हणून पुढे दिल्याप्रमाणे पूजा करावी - १. आचमन, २. संकल्प, ३. चंदनार्पण, ४. अक्षतार्पण, ५. पुष्पार्पण, ६. हरिद्रा (हळद)-कुंकूमार्पण, ७. दूर्वार्पण, ८. धूप-दीप दर्शन आणि ९. नैवेद्य. यानंतर आरती करून मंत्रपुष्पांजली समर्पावी. सर्वांनी गणपतीच्या हातावर अक्षता द्याव्या आणि मूर्ती उजव्या हाताने हालवावी.

विसर्जन : उत्तरपूजेनंतर मूर्तीचे जलाशयात विसर्जन करतात. विसर्जनाला जातांना गणपतीबरोबर दही, पोहे, नारळ, मोदक वगैरे शिदोरी द्यावी. जलाशयाजवळ पुन्हा आरती करावी आणि मूर्ती शिदोरीसह पाण्यात सोडून द्यावी.

श्री गणेश चतुर्थी या दिवशी चंद्रदर्शन करणे वर्ज्य असणे - श्री गणेश चतुर्थीला 'कलंकित चतुर्थी' असेही म्हणतात. या चतुर्थीला चंद्र पहाणे वर्जित आहे. चुकूनही चतुर्थीचा चंद्र दिसल्यास 'श्रीमद्भागवत'च्या १० व्या स्कंधाच्या ५६-५७ व्या अध्यायात दिलेली 'स्यमंतक मण्याची चोरी' ही कथा आदराने वाचली किंवा ऐकली पाहिजे. भाद्रपद शुक्ल तृतीयेचा किंवा पंचमीचा चंद्र पहावा. यामुळे चतुर्थीला चंद्रदर्शन झाल्यास त्याचा अधिक धोका रहात नाही. चुकून चंद्रदर्शन झाल्यास पुढील मंत्राने अभिमंत्रित केलेले पवित्र जल प्राशन करावे. या मंत्राचा २१, ५४ किंवा १०८ वेळा जप करावा.

सिंहः प्रसेनमवधीत् सिंहो जाम्बवता हतः ।
सुकुमारक मा रोदीस्तव ह्येष स्यमन्तकः ।। - ब्रह्मवैवर्त पुराण, अध्याय ७८




अर्थ : हे सुंदर सुकुमार ! या मण्यासाठी सिंहाने प्रसेनला मारले आहे आणि जांबुवंताने त्या सिंहाचा संहार केला आहे; म्हणून तू रडू नकोस. आता या स्यमंतक मण्यावर तुझाच अधिकार आहे.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'गणपति'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था ९२८४०२७१८०**






# परतूर ठाण्यात गणेशोत्सव, ईद निमित्त शांतता समितीची बैठक

**परतूर । प्रतिनिधी -** गणेशोत्सव,ईद ए -मिलाद या सनाच्या पार्श्वभूमीवर परतूर पोलीस स्टेशन मध्ये सोमवारी शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी , रामेश्वर रेंगे.तहसिलदार डॉ.प्रतिभा गोरे.पोलीस निरीक्षक, एस.बी.भागवत. यांची उपस्थिती होती.या प्रसंगी तहसीलदार गोरे म्हणाल्या की दरवर्षी आपण मोठे सण उत्सव असेल तर शांतता समितीची बैठक घेतो याच्या मध्ये सगळ्यांना माहिती मिळावी आणि समस्या मांडण्यासाठी बैठकीला उपस्थित असतात. प्रत्येक वेळेला प्रशासन हे सांगते की कायद्याचे पालन करा मला काही समजत नाही कायद्याचे पालन करायचं पण काही घटना घडलेल्या असतात त्याच्यामुळे ह्या गोष्टी परत परत अधोरेखित कराव्या लागतात की आपल्यासाठी कायदा आहे आणि आपण कायद्याच्या मर्यादेत राहूनच आपला उत्साह साजरा केला पाहिजे आपण जेव्हा आगमन करणार आहोत दि. २७ तारखेला परवाच्या दिवशी श्री गणेशाचे आगमन होणार आहे. दहा दिवस असणार आहेत गणपती त्याच्यानंतर सहा सप्टेंबरला विसर्जन आहे. आगमन आणि विसर्जन या मार्गांमधले जेवढे काही अडथळे आहेत त्याच्यासाठी नगरपालिका प्रशासन आणि जे काही ग्रामपंचायती मधले आहेत तर त्यांनी तिथले जे काही अडथळे आहेत ते दूर करण्यासाठी आम्हाला लवकरात लवकर प्रस्ताव द्यावे जेणेकरून आम्ही त्यांना भारतीय न्याय संहिता कलम १५२ खाली आम्ही त्यांना नोटीस देऊ आणि ते मग कायदेशीर रित्या त्यांच्या अतिक्रमण असतील किंवा काही अडथळे असतील.मग मार्गांमधील ते अडथळे दूर होतील कारण बऱ्याच वेळेला काय होतं की काही झालं तर तहसीलदार यांनीच बघायचं बाकीच्या डिपार्टमेंट ने काय करायचं हे काम आहे त्यांनी ते केले पाहिजे आता ही माहिती आम्हाला कोण देणार नगरपालिका देणार की विसर्जन मिरवणुकीमध्ये हा अडचण आहे एम एस सी बी असू द्या किंवा कुठल्या अतिक्रमणात असू द्या कुठल्याही असू द्या तुम्ही माहिती देणार आम्हाला मग आम्ही त्याच्यावरती कारवाई करणार जेणेकरून पुढे अडचण निर्माण होणार नाही आता वेळ कमी आहे त्याच्यामुळे एक दोन दिवसांमध्ये आपल्याला हे काम करावे लागणार आहे नंतर आहे विषय मुरुमाचा प्रत्येक वेळेला काय होतं की आता उद्याचं मॅडम मुरुम लागतो आम्हाला पाहिजे असं नाही जमणार हीच तर परवानगी घ्यायची म्हणून काढायची वाहनांना जीपीएस लावायचे आणि परवानगी घेऊन मुरूम काढायचा आदल्या दिवशी मग उगाच काहीतरी कारण सांगायचं धार्मिक कारण सांगायचं असं नाही जमणार तर आपल्याला कायद्याने चालावं लागणार आणि कायद्याने जो चालतो त्याला अडचणी येत नाहीत आणि उत्सव साजरा करायचा म्हटल्यानंतर आपल्यासाठी काही उत्सव आपल्यासाठी आहे त्याच्यामुळे आपण प्रत्येक वेळेला जेव्हा विसर्जन असेल तर तेव्हा जे कोणी विसर्जनाचे ठिकाण नगरपालिकेने केलेली असू द्या किंवा आपल्या रोहिण्याचा पुलावर असू द्या किंवा कुठल्या खदानी मधला असू द्या तर तिथं प्रतिबंधात्मक उपाययोजना आहेत की नाही आणि तिथे जाताना कृपा करून ज्यांना पोहता येत नाही अशा मुलांना किंवा अशा व्यक्तींना तिथे पानवट्याच्या जवळच जाऊ देऊ नये किंवा त्यांना सूचना द्याव्यात गणेश मंडळांनी की बाबा तुम्हाला पोहोता येत नाही तुम्ही जाऊ नका आणि ज्या लोकांना चांगलं पोहोता येते त्या लोकांची तिथे उपस्थिती ठेवायची दोघ तिघे तरी एखाद्या विसर्जनाच्या ठिकाणी तिथे उपस्थित असले पाहिजे म्हणजे अनुसूचित प्रकार कुठलाही वाईट प्रसंग येणार नाही अशी आपल्याला काळजी घ्यायची कारण याची




चांगल्या गोष्टी एवढ्या स्मरणात राहत नाहीत तेवढ्या वाईट राहतात त्यामुळे आपले स्मरणामध्ये आपला उत्साहात राहिला पाहिजे आपल्याला माहिती की पाच सप्टेंबरला ईद-ए-मिलाद आहे इथे आपल्याला उत्साहाने साजरा करायचा आहे आपण आपल्या माहिती आपण प्रत्येक सण उत्सव हे धर्म बाजूला ठेवून उत्साह जाता आहे त्याला आपण साथ देतो आणि पुढे चालतो म्हणून आपण इथपर्यंत आलेलो आहोत आणि म्हणून आपल्याकडे ७५ वर्षे झाले तरी लोकशाही टिकून आहे कारण आपण हे सगळे एकोप्याने राहतो हेच कारण आहे याच्या मागचं तर यासाठी इथून पुढे येणाऱ्या गणेशोत्सव असू द्या किंवा सर्वांना खूप खूप शुभेच्छा मी अशा व्यक्त करते की यासाठी जे काही पोलीस प्रत्याच्यामुळे आपण कुठल्या गोष्टीला सहजतेने घेणार नाहीत आपला उत्साह अति उत्साहू देणार नाहीत आपला उत्साह उत्साहात राहू देणार आहात आणि या निमित्त जमलेल्या सगळ्यांना मी दोन्ही सणाच्या शुभेच्छा देते.असे मत व्यक्त केले.दरम्यान बैठकीला प्रतिष्ठित नागरिक, गणेश मंडळाचे अध्यक्ष,व प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.

युवा आदर्श

**लंबोदरा ...**

विघ्नहरा सुख करा
वाजत गाजत यावे
सर्वधर्मियाचे चित्ती
निर्मित करे ओलावे
पर्यावरणपुरक मुर्ती
आकर्षण मनाभावे
जमे तशी सेवाकरी
परि खरी मनो भावे
संकटाशी लढावया
तू बळ आम्हां द्यावे
जनहितार्थ उपक्रम
सुकर्म तडीस न्यावे
यथाशक्ती पुजाअर्चा
बा गोडमानून घ्यावे
भक्त तुजला समान
कुणी ना उजवे डावे
मोदक देई भुकेल्या
मग प्रसाद मी खावे
अन्न दान पुण्य भले
उत्सवनिमीत्ते व्हावे
विसर्जन कुंडी मध्ये
नव बीज तिथे लावे
पुढीलवर्षी त्वरे यावे
गणेशा भाव बोलावे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

# मारवाडी गल्लीतील रस्त्याची डागडुजी: नागरिकांमध्ये आनंद

## शिवसेना शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांच्या मागणीला यश

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील काद्राबाद परिसरातील मारवाडी गल्लीतील रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले होते. या खड्ड्यांमुळे वारंवार अपघात होत होते, आणि जालनाचा मानाचा गणपती याच ठिकाणी बसवला जातो. यामुळे, शिवसेनेचे शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांनी महानगरपालिकेचे आयुक्त खांडेकर यांच्याकडे या रस्त्याच्या डागडुजीची मागणी केली होती.

काठोठीवाले यांनी या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केला, आणि अखेर महानगरपालिकेने गणपतीच्या स्थापनेच्या तोंडावर रस्त्यावरील खड्डे बुजवले. यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

मंगळवार (दि २६) रोजी शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांच्यासह मानाचा गणपतीचे अध्यक्ष राजेंद्र आबड, जयेश शहा, अलकेश अग्रवाल, प्रकाश गोरंट्याल, हेंमत गिंदोडिया, राहुल तालुका, रमेश दलाल, महेश दुसाने, रमेश गौरक्षक, संतोष काबलिये, दर्शित आबड, अजय मिसाळ, मयुर सावजी आदींनी या कामाची पाहणी केली. नागरिकांच्या समस्या सोडवल्याबद्दल शहरप्रमुख काठोठीवाले यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घेतला महसूल विभागाच्या आढावा

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज महसूल विभागातील सर्व विभागांचा सविस्तर आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित आढावा बैठकीत उप जिल्हाधिकारी, सर्व उप विभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी सदरील बैठकीत सर्व उप विभागीय अधिकारी यांनी दरमहा २ तर तहसीलदार यांनी दरमहा ४ क्षेत्रभेटी करण्याच्या सूचना देवून, ग्रामपातळीवरील जनतेशी सातत्याने सुसंवाद ठेवण्यास सांगितले. तसेच कार्यालयीन कामकाज करतांना तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करावा. मंडळ अधिकारी, तलाठी, तहसिल कार्यालयातील कर्मचारी यांचे सक्षमीकरण करुन ई-ऑफिस प्रशिक्षणाचे आयोजन करावे. तसेच माहे नोव्हेंबर २०२५ पर्यंत नागरिकांच्या प्रलंबित सर्व तक्रारीचे निराकरण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसेच श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानांतर्गत दि. १७ सप्टेंबर, २०२५ ते २ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत मिशन मोडवर कामकाज करुन, यात पाणंद रस्ते गाव नकाशावर घेणे, सर्वांसाठी घरे या अभियानांतर्गत पट्टेवाटप करण्याचा कार्यक्रम घेण्याबाबात सांगितले. नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या सेवा विषयक माहिती तात्काळ उपलब्ध करून देण्यात याव्यात. मा. मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार राबविण्यात येत असलेल्या विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित दीडशे दिवसांचा कृती आराखडा राबविण्यात येत असून, या कार्यक्रमातील सर्व सेवा विषयक बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# अंकुशराव टोपे महाविद्यालयाचा गौरव




**जालना । प्रतिनिधी -** स्वातंत्र्यदिनानिमित्त पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांच्या वतीने अंकुशराव टोपे महाविद्यालयातील विद्यार्थ्यासाठी व्यसनमुक्ती संदर्भात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये व्यसनमुक्तीवर आधारित विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमध्ये प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या अनुक्रमे रुद्र प्रताप साहू , कु. प्रांजल पोपळे व संजय मिसाळ या विद्यार्थ्यांचा सत्कार पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, पोलीस उपधीक्षक रवींद्र निकाळजे,पो.कॉ.संजय सोनवणे, पर्यवेक्षक प्रा.रामप्रसाद भालेकर आणि विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे व सर्व प्राध्यापक यांनी अभिनंदन केले.